# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-०६-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक २० जून २०१८ रोजी (का.क्र.प. १५) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.२५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव,श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २२. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २३. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २४. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २५. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २६. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २७. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २९. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| ३०. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३२. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३३. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३४. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३५. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३६. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३७. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३८. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३९. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ४०. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४१. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४२. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४३. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४४. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४५. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४६. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४७. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४८. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४९. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ५०. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ५१. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ५२. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५३. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५४. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५५. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५६. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५७. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५८. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५९. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ६०. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ६१. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ६२. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ६३. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६४. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६६. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६७. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६८. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६९. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ७०. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७१. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७२. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७३. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७४. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७५. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७६. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७७. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७८. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७९. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ८०. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ८१. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८२. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८३. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८४. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८५. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८६. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८७. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८८. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ९०. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९१. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९२. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९३. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९४. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९५. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९६. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९७. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.गजानन बारवाल :राष्ट्रसंत श्री.भय्युजी महाराज यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.प्रमोद राठोड :नाल्यात पाण्याच्या प्रवाहात वाहत गेल्याने जयभवानीनगर येथील श्री.भगवान मोरे यांचा मृत्यू झाला. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे. श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वांनी उभे रहावे.

या वेळी स्व.भय्युजी महाराज तसेच स्व.भगवान मोरे यांचे निधन झाल्याने त्यांना दोन मिनिटे सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्रीमती मनीषा मुंढे :एक वर्षापासून वार्डातील नाला खोदून ठेवला. काम होत नाही. प्रत्येक सभेत प्रश्न मांडला. मार्कींगनुसार जयभवानीनगर नाल्यात मधोमध लाईन टाकली नाही. घराचे अतिक्रमण होते काढले नाही. यापूर्वी संचिका गहाळ झाली होती. मी महिला आहे. म्हणून काम तेथे होत नाही का? तेथील काम वेळीच केले असते तर श्री.भगवान मोरे यांचा जीव गेला नसता, आणखीही लोकांचे जीव जातील. श्री.मोरे यांचे कूटूंबीयास रु.५ लक्षची आर्थीक मदत व राहण्यास घर देण्यात यावे.

श्री.प्रमोद राठोड :बजेटच्या बैठकीत जयभवानीनगर येथील नाल्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. एक वर्षापासून येथील नाल्याच्या कामाबाबत चर्चा करतो आहे. मा.पालकमंत्री यांनी तेथे भेट दिली होती. तेथील अतिक्रमण काढण्याचे आदेशीत केले होते. काही अतिक्रमण काढले काही काढले नाही. ज्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबत होता ते अतिक्रमण काढले नाही. अधिकारी यांनी कामचुकारपणा केला. तेथे कुणाचा तरी बळी जाईल असे आम्ही नेहमीच सांगत होतो. तोच प्रकार तेथे झाला. काल तेथे पाण्याच्या प्रवाहात श्री.भगवान मोरे वाहून गेल्याने मृत्यू झाला. गेल्या बैठकीत तेथील अतिक्रमण तीन दिवसात काढावे. आदेशीत केले होते. मा.आयुक्तांनी विशेष अधिकारी म्हणून श्री.रविंद्र निकम यांना नियुक्त केले होते. तीन दिवसात कार्यवाही केली नाही. काल संध्याकाळी मा.आयुक्तांना फोनवरून कल्पना दिली की, पाऊस पडणार आहे. पाणी जमा होईल. लोकांच्या घरात पाणी जाईल. लक्ष देणे आवश्यक आहे. त्यावर आयुक्तांनी असे म्हटले की, श्री.रविंद्र निकम यांना आदेश केलेले आहेत. ॲक्शन घेणेस सांगितलेले आहे. ते माहिती देतील. श्री.निकम यांनी मला फोन करून सांगितले की, मी तेथे प्रयत्न करीत आहे. तेथे वाद चालू आहे. त्यांना समजाविण्याचा प्रयत्न करतो आहे. चार दिवस वाढवून दिले. ती व्यक्ती त्यांनी केलेले अतिक्रमण स्वत:हून काढणार आहे. त्यांना स्वत:हून काढायचे असते तर एक वर्षापासून का काढले नाही? म्हणजे जर कुणी विरोध केला तर काम थांबविणार व एखादा शांतपणे त्यांची प्रॉपर्टी मनपास देत असेल तर ती तोडायची. हे योग्य आहे का? चार दिवस वाढवून द्यायचे. श्री.निकम यांना कुणी अधिकार दिला? तीन दिवसापुर्वी ॲक्शन घेतली असती तर पाण्याचा प्रवाह थांबला नसता. ज्या ठिकाणी श्री.भगवान मोरे पाण्यात बुडाले, तो खड्डा मी व श्रीमती मनीषा मुंढे ताई, श्री.अफसर सिध्दीकी यांना एक वर्षापासून दाखवतो. कार्यवाही केली नाही. त्या ठिकाणी जाळी टाकण्याचा प्रयत्न केला नाही. इतर उपाय का केला नाही? तेथे व्यक्ती बूडू

शकतो हे सांगितले होते. तेथे मार्कींग होत नाही. किती दिवसात मार्कींग करणार आहे? एक विभाग दुसरे विभागावर ढकलतो. हे योग्य नाही. लोकांचे जीव जात आहेत. तरी दखल घेत नाही. तेथून लहान मूले पायी जातात. पाऊस येणार पुन्हा तीच घटना घडणार आहे. श्री.भगवान मोरे वाहून गेले. शोध घेतला सापडले नाही. आज त्यांचा मृतदेह सापडला. आजही तेथे आहे तीच परिस्थिती आहे. काम केले नाही. नागरीकांचा रोष काय होता? आपण सर्वांनी प्रत्यक्ष पाहिले. श्री.निकम यांना निलंबीत केले, ते उद्या कामावर येतील. त्या व्यक्तीचा जीव येणार आहे का? श्री.रविंद्र निकम यांचेवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. संबंधीत जे मृत झाले, त्यांचे कुटूंबीयांना पाच लक्षची मदत करावी. पावसाळ्यामध्ये अतिक्रमण काढता येत नाही असे सांगतात. हे जीआर जे असतात ते अतिक्रमण न काढणेसाठी असतात. काढायचे वेळेस जीआर कुठे असतो. यापुर्वी श्री.बकोरीया साहेब होते त्यांनी म्हटले होते की, पावसाळा संपेल तेव्हा अतिक्रमण काढू. परंतु पावसाळा संपल्यानंतर कुणीही जात नाही. काम करीत नाही. त्या नाल्यावर दोन घरे ही अधिकारी यांचे नातेवाइकांचे आहे. म्हणून ते तोडली जात नाही. बाकीचे तोडले ते का तोडले जात नाही? ज्या व्यक्तीचा जीव गेला तो परत आणणार का? वडील हरवले म्हणून मुलगा शोध घेत होता. वडील मृत्यू पावले समोर दिसले काय विचार आला असेल? त्या व्यक्तीचे कुटूंबाला काय वाटत असेल? त्याचे मनात काय आले असेल? आता तरी मनपाने कामात सुधारणा केली पाहिजे. मनुष्यवधाचा गुन्हा अधिकाऱ्यावर दाखल करावा. मा.आयुक्तानी आदेश केल्यानंतर अधिकारी कामचुकारपणा करीत असतील तर आपण महापालिकेत असण्याला अर्थ काय? योग्य ती कार्यवाही संबंधीतावर करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :जे प्रकरणात दोषी असतील, त्यांचेवर गुन्हा दाखल करावा. महापालिकेकडे नाल्याचा मॅप उपलब्ध नाही, असे टीपी विभागाचे उत्तर मिळते. मॅप मनपाकडे नाही असे होऊ शकते का? नाल्यामध्ये ज्या इन्क्रोजमेन्ट आहे मॅप नाही म्हणून श्री.तनपुरे नावाचे अधिकारी यांनी इकडे का तिकडे ५ फुट अशी नाल्याची मार्कींग झाली. यावर बेसीकली कार्यवाही व्हावी. कार्यवाही करीत असतांना अतिक्रमण विभाग व टीपी विभागाने चुकीची मार्कींग केली. या संदर्भात सातत्याने ३-४ महिनेपासून पाठपुरावा झाला. स्थायी समितीमध्ये निर्णय दिला असतांना कार्यवाही केली. जयभवानीनगर नाल्याच्या संदर्भात कार्यवाही केली नाही. यात टीपी विभाग व अतिक्रमण विभाग दोषी आहे. अतिक्रमण विभागाने अतिक्रमण काढणेसाठी टाळाटाळ केली. नियमानुसार कार्यवाही करावी. असे अनेकदा सांगितल्यानंतर सुध्दा अतिक्रमण विभागाने कार्यवाही केली नाही. त्यामूळे तेथील नाल्यात दुर्देवी घटनेस सामोरे जावे लागले. आम्ही एक ठराव दिला. ते कुटूंब गरीब आहे त्यांना पाच लक्ष आर्थीक मदत करावी. या कुटूंबीयास राहण्यासाठी हर्सुल भागात जी मनपाची जमीन आहे तेथे जागा द्यावी. या प्रकरणामध्ये आणखी श्री.तनपुरे, श्री.अभंग यांचेवर कार्यवाही करावी. मुळ विषय असा की, खिल्लारी कंपनीचे भुमीगत गटारचे काम होते. त्याचे

संबंधीत विषय आहे. त्याची पीएमसी असेल व अधिकारी असेल या सर्वांची प्रकरणाची चौकशी आयुक्तांनी करावी व संबंधीतावर कार्यवाही करावी. जे जे दोषी असेल त्यांचेवर ३०२ नुसार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :जयभवानीनगर येथील नाल्याचे संदर्भात अनेक वेळा चर्चा झाली. मा.आयुक्त यांनीही अनेक वेळा आदेश दिले होते. खालचे अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही. अतिक्रमण विभागाने कार्यवाही का केली नाही? माझे वार्डात नाल्यावर अतिक्रमण होत आहे. फोन केला तरी ही कार्यवाही केली नाही.

श्री.भगवान घडमोडे :जयभवानीनगर येथील नाल्यात एका निष्पाप नागरीकांचा बळी गेला. त्या कुटूंबाची अवस्था काय असेल? अनेक वेळा सभागृहात यावर वार्डाचे सदस्या श्रीमती मुंढे यांनी चर्चा केली. वेळीच कार्यवाही का केली नाही? यात प्रत्येक विभागाने कामचुकारपणा केला आहे. तेथे अनेक लोकप्रतिनिधी यांनी व्हिजीट केली. विभागाला सुचना दिल्या. ते अतिक्रमण काढले पाहिजे. परंतु काम केले नाही. हा अचानक प्रसंग उद्‌भवला नाही. टीपी विभागाचा अहवाल येतो. अतिक्रमणाचा भुमिगत योजनेचा अहवाल येतो. असे सांगून काम केले नाही. कुणाचे हितसंबंध गुंतले होते का? अतिक्रमण विभागाने चुक केली आहे सर्व विभागाची चौकशी करावी यात कोण दोषी आहे? त्या कुटूंबाचा कर्ता माणूस गेला आहे. ज्या ज्या विभागाचे अधिकारी दोषी असेल कार्यवाही करावी. यानंतर अशा घटना होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :यावर अनेकदा सभागृहात चर्चा केली. जयभवानीनगर मधील आजची परिस्थिती वाईट आहे. चर्चा झाली. निर्णय झालेले असतांना प्रशासनाने कार्यवाही का केली नाही? आम्ही विषय मांडला की, संशय घेतला जातो की, आमचे काही हितसंबंध तेथे आहे. हे योग्य नाही. जयभवानी नाल्याचे काम केले नाही. तेथे एकाचा बळी गेला. ही बाब भरून निघणारी नाही. ज्यांनी सांगितलेले काम केले नाही त्यांचेवर कार्यवाही करावी. त्या कुटूंबाच्या मागे आपण उभे आहोत. नकाशावर नाला नाही असे सांगितले जाते. नॅचरल प्रवाह नाल्याचा असतोच तेथे जागा केली. जागा विक्री केली असेल त्यांचेवरही गुन्हे दाखल करावे. त्या नाल्याच्या ठिकाणी व्हिजीट पण केली होती. शहरात आता ज्या ज्या ठिकाणी नाल्याचा प्रवाह बंद झाला असेल त्याबाबत कार्यवाही व्हावी. नाल्याची जागा विक्री होत असेल तर ते बंद व्हावे. तेथील अतिक्रमण काढावे. भुमिगत योजनेच्या माध्यमातून जे पाईप टाकले ते नाल्यामधून टाकले पाण्याचा प्रवाह थांबलेला आहे माती गाळ नाल्यातच आहे. उचलला नाही. या कुटूंबावर जी वेळ आली त्यांना आर्थीक मदत करावी. त्या कूटूबीयांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च मनपाचे द्यावा. मनपाच्या जागा आहे काहींना प्लॉट दिले आहेत त्या ठिकाणी मोरे कुटूंबीयांना जागा द्यावी. अशी घटना पुन्हा होऊ नये काळजी घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :जयभवानीनगरचा नाला माझे वार्डातून जातो. पुढे नाल्यातून पाणी जात नाही म्हणून लोकांच्या घरात पाणी जाते. त्या नाल्यात आज श्री.भगवान मोरे यांचा बळी गेला. त्या नाल्याजवळच शाळा आहे. त्या शाळेची संरक्षीत भिंत पडली

आहे. तेथून शाळेत पाणी जाते. ती भिंत बाधावी. सी-सेक्टर मध्ये एका नागरीकाने संरक्षीत भित बांधली. ती अतिक्रमण म्हणून तोडली. परंतु पुन्हा भिंत बांधली नाही. श्री.मोरे यांचे पत्नीला मनपा सेवेत घ्यावे. लहान मुले आहे. मा.आयुक्त, मा.महापौर यांचे आदेश अधिकारी यांनी पाळले नाही. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. काम केले असते तर ही वेळ आली नसती.

श्री.भाऊसाहेब जगताप :श्री.भगवान मोरे यांचा जयभवानीनगर नाल्याच्या खड्डयात पडून मृत्यू झाला. ती व्यक्ती मोलमजुरी करणेसाठी या शहरात आले होते. या नाल्याचे रूंदीकरण करावे अतिक्रमण काढावे अनेकदा निर्णय दिला. कार्यवाही केली नाही. त्यांचे कुटूंबीयाना आर्थीक मदत द्यावी. त्यांना जागा द्यावी. तसेच श्री.मोरे यांचे कुटूंबातील एका व्यक्तीस नोकरी द्यावी. तसेच अंत्यविधीसाठी हिंगोलीला जायचे असल्याने तातडीने तीही व्यवस्था करावी. जे जे तेथील नाल्याचे काम न करण्यामध्ये दोषी असतील. कार्यवाही करावी.

श्री.गंगाधर ढगे :जी घटना घडली ती वाईट आहे. त्या कुटूंबाच्या दुःखात आपण सहभागी आहोत. ते अतिक्रमण काढावे. मागणी केली होती. कार्यवाही केली नाही. पावसाळ्यामध्ये अतिक्रमण काढणे योग्य आहे का? दिनांक ११.०६.२०१८ रोजी उपआयुक्त यांना नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याचे सांगितले होते. नाल्याचा नैसर्गीक प्रवाह बंद होता तर हा व्यक्ती वाहून कसा गेला. त्याचे बाजूला ही घटना झाली आहे. जेथे ढापे नसतील चेंबर उघडे असेल तेथे ताबडतोब कार्यवाही केली पाहिजे. तेथील काम केले नाही म्हणुन काल श्री.निकमवर कार्यवाही केली. ती योग्य नाही. शासनाने पत्र आहे की, पावसाळ्यामध्ये अतिक्रमण काढू नये. पावसाळ्यानंतर कार्यवाही करायला पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे :तीन वर्षापासून तेथील अतिक्रमण काढण्याची मागणी आहे.

या वेळी एकाच वेळी सदस्य बोलत होते

श्री.प्रमोद राठोड :श्री.निकम यांचेवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :जे जे दोषी आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :वैद्यकीय अधिकारी यांनी त्या कुटूंबीयांना आवश्यक ती मदत करणेसाठी मनपाचे टीमला घाटीमध्ये पाठवावे.

श्री.विकास जैन :दिनांक ६ जुनला पहिला पाऊस झाला. त्यावेळीच या वार्डात व्हिजीट केली होती. सर्व अधिकारी यांना तेथे काम करणे बाबत सुचना केल्या होत्या. तरीही तेथे काम केले नाही. लोकांना मोठा रोष होता. या कुटूंबीयांना आर्थीक मदत व इतर मदत मिळणेसाठी ठराव ठेवला आहे. मान्यता द्यावी. जे ही अधिकारी दोषी असेल कार्यवाही करावी. भुमिगत कंपनीने काम व्यवस्थीत केले नाही. पीएमसीची चुक आहे. त्यांचेवरही कार्यवाही करावी. अशा प्रकारची घटना पुढे होणार नाही. याची दखल घ्यावी.

श्री.सय्यद मतीन :जयभवानीनगर येथील नाल्याचे काम केले नाही. जे जे दोषी असेल त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. या प्रमाणेच नुरकॉलनी मध्ये सन-२०१५ रोजी श्री.अब्दुल माजिद, श्री.समीर फारूकी व्यक्तीचाही असाच मृत्यू झाला. त्यांना ही मदत करावी.

श्री जहागीर खान :पुर्ण नाल्याची साफसफाई करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :वेळोवेळी या नाल्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. दखल घेतली नाही. जे कुणी यात दोषी असेल कार्यवाही करावी. तेथे मार्कींगचा प्रश्न होता परंतु नैसर्गीक प्रवाह हा महत्वाचा ठरतो. जे जे दोषी असेल कार्यवाही करावी. त्या कुटूंबीयांना आर्थीक मदत करावी.

श्री अय्युब जहागीरदार :तीन वर्षापासून गंभीर विषयावर चर्चा होते कार्यवाही होत नाही. मागिल बैठकीत जयभवानीनगर येथील नाल्याचे काम करावे असे मागणी केली होती. या विषयाला गंभीरतेने घेतले नाही. पावसाळ्याच्या दोन महिने काम करायला पाहिजे. महापालिकेच्या चुकीमूळे श्री.भगवान मोरे यांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांचे कुटूंबीयांना आर्थीक मदत करावी. तसेच या प्रकरणात जे जे दोषी आहे कार्यवाही करावी.

उपमहापौर :दिनांक ११.०६.२०१८ रोजीच्या सभेत या नाल्याचे काम करणे बाबतीत चर्चा झाली होती. सक्षम अधिकारी नियुक्त करण्याचे आदेशीत केले जाईल. असे सांगण्यात आले होते. जी घटना घडली वाईट आहे. नाल्याचे प्रकरण दोन वर्षापासून चालू होते. दोन तीन घरे पाडण्यासाठी एवढा उशीर का लागला? मागिल चार बैठकीपासून स.सदस्या श्रीमती मुंढे यांनी या संदर्भात व्यथा मांडली. जनतेच्या हितासाठी सदस्य भावना व्यक्त करीत असतात. मा.महापौर, मा.आयुक्त आदेश देतात. त्याचे पालन अधिकारी करीत नाही. हे योग्य नाही. घटनेचा क्रम काय होता? त्या नाल्याचे खोलीकरण व इतर काम करतांना कुणाकडे काय काम दिले होते? त्याची माहिती घेऊन जे दोषी असेल कार्यवाही व्हावी. तसेच जे श्री.मोरे यांचा मृत्यू झाला. त्यांचे कुटूंबीयांना मदत करावी. त्याचे कुटूंबीयांना प्लॉट जागा द्यावी. ज्यांचे नाल्यावर अतिक्रमण आहे. त्यांचेवरही कार्यवाही करावी. जे दोषी अधिकारी आहे. त्यांच्यावर कार्यवाही करावी.

मा.महापौर :जयभवानीनगर भागात दुर्देवी घटना घडली, श्री.भगवान मोरे यांचा पाण्यात बूडून अपघाती निधन झाले. या घटनेची महापालिका जबाबदारी स्विकारते. त्या नाल्याचा प्रवाह असेल, अतिक्रमण असेल, भुमिगत गटार योजनेचे काम असेल तसेच तेथे स्लॅबवर जाळी टाकण्याचा विषय असेल यात मनपाचे अधिकारी कर्मचारी यांना अपयश आले व त्यांनी कामात दिरंगाई केली. चुक केली. त्यामूळे ही घटना घडली. अशी भावना सभागृहाची आहे. तीन वर्षापासून सतत हा विषय मांडला गेला. आदेश देऊन कार्यवाही केली नाही. प्रशासनाला सभागृहा बाहेर गेल्यानंतर सांगितलेल्या कामाचा विसर पडत असेल व अशा घटना घडत असेल तर जे जे यात दोषी आहे याची मा.आयुक्तांनी चौकशी करावी व योग्य ती कार्यवाही करावी. अनाधिकृत प्लॉटींगचा विषय आला. जयभवानीनगरच्या नाल्याचा प्लॅन नाही. नागरीक आपले आहे. अतिक्रमण काढतांना सुध्दा या विभागाचा कारभार संशयास्पद वाटतो. कमी जास्त फुटापर्यत अतिक्रमण काढले, बांधकाम तोडले नागरीकाचे विषय समोर आले. मागिल वर्षी सुध्दा या नाल्याला पाणी आले होते. नागरीकांना त्रास झाला. ती

परिस्थिती बघता, तेथे काम होणे अपेक्षीत होते. मा.पालकमंत्री महोदय यांनी सुध्दा तेथे भेट दिली होती. तरीही दखल प्रशासनाने घेतली नाही. अतिक्रमण विभागाने केलेली दिरंगाई, तसेच भुमिगत योजनेची लाईन टाकतांना काढलेला मलबा असेल तो नाल्यातच पडून आहे काढला नाही. पाणी जाण्यास अडथळा आला. इतरही कामे झाले नाही. यात निष्काळजीपणा झाला. असेल तर सर्व चौकशी मा.आयुक्तांनी करावी व कडक कार्यवाही करावी. टीपी विभागाने इल्लिगल सर्व वस्त्याचा एखाद्या खाजगी संस्थेला सर्वेचे काम देऊन सर्वे करायला पाहिजे. नागरीकानी नैसर्गिक प्रवाह अडविलेला असेल तर योग्य नाही. आणखीही घटना घडू शकतात. जी घटना घडली. तेथेच शाळेची भिंत आहे. ती पडली. ते काम व सी-सेक्टर मधील भिंतीचे काम करावे. नाल्याचे काम व संरक्षीत भिंतीचे काम देण्यात आले. त्यास ३-४ महिन्याचा कालावधी आहे. परंतु ही आणीबाणीची परीस्थिती आहे. तात्काळ ते काम आणखी यंत्रसामुग्री वाढवून करून घ्यावे. नाला केल्यानंतर अप्रोज रोडचे काम मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात करावे. आजच या कामाबाबत निर्णय घ्यावा. शहरात सर्वच नाल्याच्या बाजूची घरे बाबत सतर्क राहणे आवश्यक आहे. पर्यायी व्यवस्था असावी. जयभवानीनगरच्या लोकांनाही तेथील परिस्थितीची जाणीव करून द्यावी व तसे कळवावे. आपत्कालीन कक्ष निर्माण करावा. सर्व विभागाने एकत्रित बसून चांगले नियोजन करावे.

श्री.भगवान मोरे यांचा पाण्याच्या प्रवाहात पडून मृत्यू झाला. त्याचे कुटूंबीयांना मदत करणे आवश्यक आहे. त्यास दोन मुले व एक मुलगी आहे. त्याचे कुटूंबीयाना आधार नाही. त्यांचे कुटूंबीयांना रु.५ लक्ष रूपयाची आर्थिक मदत मुलीच्या नावावर रु.२ लक्ष डिपॉजीट व दोन मुलांच्या नावे प्रत्येकी र.रु.५० हजार व पत्नीच्या नावे र.रु.२ लक्ष रूपये रोख तात्काळ देण्यात येते. त्यांचे कुटूंबातील मुला मुलींची शिक्षणाची जबाबदारी मनपाने घ्यावी. तसेच हर्सुल येथील मनपाच्या मालकीचे विस्थापीतांना प्लॉट दिले. या कुटूंबीयाच्या नावाने एक प्लॉट किंवा घर द्यावे. या प्रकरणाची संपुर्ण चौकशी मा.आयुक्तांनी करावी. जे जे विभाग जबाबदार असतील दोन दिवसामध्ये माहिती घ्यावी अहवाल द्यावा. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. आता सभा एक तासासाठी तहकूब करण्यात येते (वेळ दुपारी १.५० वा पुन्हा सभा दुपारी ३ वाजेला सुरू)

श्री.सिताराम सुरे :एक वर्षापासून दुषित पाण्याचा प्रश्न वार्डात आहे. काही प्रमाणात निकाली काढला होता. पुर्ण कार्यवाही केली नाही. वार्डात पाईपलाईनच्या संचिका वाटाघाटीसाठी आलेल्या आहेत. महिला माझे घरी पाण्यासाठी येतात. येणारे पाणी दुषीत पाणी येते. माझे वार्डात पाहणी करावी. तसेच एलईडी लाईट लावण्याचे काम चालू आहे वार्डात लाईट लावण्यास आले ७ लाईट लावले २ बंद पडले, परत कुणीही आले नाही. विकास कामाच्या संचिका थांबून आहे. १५-१६ बजेटमध्ये र.रु.१५ लक्षची कामे दिली. तेवढीच कामे झाली. सन १६-१७ मध्ये बजेट दिले त्यातील कामे काही झाली नाही. सन १७-१८ मधील बजेट

झाले नाही. त्यातील काही संचिका मंजूर आहे. टेंडर झाले. काही संचिका वाटाघाटीसाठी आहे. निर्णय घेत नाही. प्रत्येक वार्डात व्हिजीट द्यावी वार्डात कामे करणे आवश्यक आहे. त्या संचिका मंजूर कराव्यात.

मा.महापौर :दुषीत पाण्याचा प्रश्न श्री.कोल्हे, श्री.चहल यांनी सोडवावा. तसेच श्री.खमर यांनी लाईटचे काम तात्काळ करावे. सकाळी ७ वाजेला या वार्डात मी स्वत: भेट देतो. पाहणी करतो.

श्री.गजानन मनगटे :एजन्सी फिक्सींगच्या संचिकेवर सह्या करण्याचे आदेशीत करावे.

श्री.पुनमचंद बम्हणे :कचऱ्याच्या गाड्या अडविल्या म्हणून माझेवर गुन्हा दाखल झाला तर आता तेथील कचऱ्यामूळे पाणी दुषीत झाले. तर कुणावर काय कार्यवाही करणार आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :हर्सुलला जो कचरा टाकला जातो आहे त्यामुळे बाजूच्या विहीरीचे पाणी दुषीत झाले. ते पाणी हर्सुल गावाला दिले जाते. त्या पाण्यामूळे रोगराई होऊ शकते. जसा सदस्यांवर गुन्हा दाखल केला आता दुषीत पाणी झाले तर अधिकारी यांचेवर गुन्हा दाखल करणार काय?

श्री.राजू शिंदे :सदस्य श्री.बमणे यांनी हर्सुल परिसरात मिक्स कचरा आल्याने व तेथील पाणी दुषीत होऊ नये म्हणुन नागरीकांच्या सोबत येऊन कचरा टाकण्यास विरोध केला. म्हणुन त्यांचेवर गुन्हा दाखल केला. परंतु कुणी नगरसेवक हे त्यांचे वैयक्तिक हितासाठी विरोध करतात. असे नाही. सॉलीड-वेस्ट मॅनेजमेन्टचे सन २००६ नियम काय आहे? त्या नियमानुसार काम चालते का? तेथील कचऱ्यातून दुषीत पाणी विहिरीत गेले. ते पिण्यासाठी जाते. ते थांबविले नसते तर लोक मृत्यू मुखी पडले असते. मनपाच्या चुकीमूळे ही परिस्थिती येते. सन २०१६ चे शासन नियम कडक आहे. माझे वार्डातही खड्डे करून कचरा टाकला जातो. कोणत्याही खेळाचे मैदान, विहिर असेल, तलाव असेल त्या जवळ कचरा टाकू नये असे नियमात आहे. जेथे जागा मिळेल तेथे कचरा टाकला जातो आहे. त्या विहिरीतून पाणी दुषीत येत आहे. तेच पाणी हर्सुलच्या लोकाना देतो. आता हर्सुल गावाला पाण्याची काय व्यवस्था केली? सातारा देवळाई भागात १००० हजार एलईडी लावण्याचा निर्णय घेतला. कार्यवाही होत नाही. मोफत टँकरने पाणी देणार होते ३-४ टँकरच पाणी जाते. ते ही विहिरीत टाकतात. सभागृहाचे आदेश पाळत नसेल तर हे योग्य नाही.

मा.महापौर :ताबडतोब या बाबत कार्यवाही करावी.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य जमा होतात.

मा.महापौर :स.सदस्य श्री.बमणे यांचे वार्डातील कचऱ्याचा जो प्रश्न आहे. त्या बाबतीत दुपारी ४.०० वाजता सर्व पदाधिकारी, गटनेते, प्रशासन पाहणी करू. आता सर्वांनी जागेवर बसावे.

सभागृहात श्री.पुनमचंद बमणे हे डायस समोर खाली बसतात. हर्सुल येथील कचरा प्रश्न सोडवावा. पाहणी करावी. अशी मागणी करतात.

श्री.रामेश्वर भादवे :सातारा देवळाई भागात लाईट लावावे.

उपमहापौर :हर्सुलच्या लोकांनी स.सदस्य श्री.बमणे यांना घेराव घातला होता. तेथील परिस्थिती वाईट आहे. पाहणी करावी.

मा.महापौर :सभागृहाची शिस्त पाळावी लागेल. सर्वांनी जागेवर बसावे. नसता कार्यवाही करावी लागेल.

श्रीमती संगीता वाघुले :माझे वार्डात नाल्यामध्ये अतिक्रमण झाले, खिल्लारी कन्ट्रक्शनने लाईनचे कामे बरोबर केलेले नाही. काल पावसामूळे चेंबर फुटून पाईप नाल्यात वाहून गेले. पावसाळ्यात लोकांच्या घरामध्ये पाणी जाते. दखल घेतली जात नाही. पुलाचे काम होत नाही. वार्डात एलईडी लाईट लावावे.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी या भागात पाहणी करावी. काम तातडीने करण्याबाबत कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :महिला सदस्यांचे जे विषय, प्रश्न असेल ते वेळे अभावी पाहिजे तेवढे लक्ष देता आले नसेल तर दर महिन्याला एक दिवस दोन तास महिलाचे जे विषय असतील ते आढावा घेऊन विषय मार्गी लावले जातील.

मा.महापौर :शहर अभियंता त्या भागाचे वार्ड अधिकारी, वार्ड अभियंता तसेच अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांनी स्थळ पाहणी करावी व जे काम असेल मा.आयुक्तांची सही घेऊन काम सुरू करावे.

श्री.अफसर खान :तीन वर्ष झाले कामे होत नाही. एक दीड वर्षापासून काही संचिका टेंडर होऊन झालेल्या आहे. कामासाठी बजेट मध्ये तरतूद आहे तरीही कामे होत नाही. संचिका मंजूर होत नाही. काही एजन्सी फिक्सींगच्या संचिका आहे. प्रत्येक वार्डातील एकच संचिका मंजूर करणार असे अति.आयुक्त सांगतात. हे योग्य नाही. हे आदेश त्यांना कुणी दिले. विकास कामाच्या संचिका का थांबविल्या जात आहे? अतिरिक्त आयुक्त यांचा खुलासा घ्यावा.असे होत असेल तर यांना शासनाकडे पाठवावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:एकच रु.१० लक्षची संचिका मंजूर करणार असेल तर योग्य नाही. इतर कामे कशी करणार आहे?

श्रीमती सायरा बानो :काजीवाडा, फाजीलपुरा नाल्याचे कालच्या पावसाचे पाणी पाच कॉलनीत आले. नाले होते. आता नाली झाली आहे. अतिक्रमण काढावे. नाल्यातील घाण बाहेर काढावी. यापुर्वी या नाल्यात एक मुलगा पाण्यात बुडाला होता.

मा.महापौर :या नाल्याची शहर अभियंता यांनी पाहणी करावी.

श्रीमती ज्योती अभंग :माझे वार्डातील पाणी लाईनची संचिका आदेश देऊनही मंजूर होत नाही.

मा.महापौर :संचिका ताबडतोब मंजूर करावी.

श्रीमती सुरेखा सानप :फुलेनगर भागात दुषीत पाणी येते काम होत नाही. गोसावी समाज स्मशानभुमीमध्ये काही समाजकंटकांनी समाधी काढून फेकून दिल्या. तेथे वॉचमन नाही. ती संचिका एजन्सी फिक्सींगला आहे. मंजूर होत नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रत्येक वार्डातील विकास कामाच्या संचिका आहे. १०-१० वेळेस टेंडर झाले कुणीही घेतले नाही. आता काही कामे मंजूर आहे. त्या बाबत आदेश दिले की, रु.१० लक्षचीच कामे एका वार्डातील मंजूर करावी. हा चुकीचा निर्णय आहे. दोन-तीन वर्षापासून त्या संचिका चालू होत्या. आता आमचा कार्यकाळ दीड

दोन वर्ष आहे वार्डात कामे व्हावी. सर्व विकास कामाच्या संचिका मंजूर कराव्यात. पाणी पुरवठ्याची कामे व्हावी. इतर कामे रु.१० लक्षमध्ये कशी होणार आहे? कुठलाही भेदभाव न करता सर्व कामे करावी. उत्पन्न कसे वाढवायचे प्रशासनाने ठरवावे. कोणतीही कामे थांबवू नये.

श्रीमती वैशाली जाधव :हिनानगर, सावित्रीनगर भागात रस्त्यावर मुरूम टाकावा. एलईडी लाईट नाही अंतर्गत लाईटही नाही. रस्त्याची कामे मंजूर असूनही होत नाही. ड्रेनेज लाईनचे काम होत नाही. पाणीपुरवठ्याची लाईन होत नाही.

मा.महापौर :तातडीने लाईटची व इतर कामे करण्यात यावी.

श्रीमती सरिता बोर्डे :वार्ड ७१ मध्ये कचरा उचलला जात नाही. पावसामूळे कचरा नालीत जाऊन पावसाच्या पाण्यामूळे तो कचरा वाहून लोकांच्या घरात गेलेला होता. दुसरे वार्डाचा कचरा माझ्या वार्डात आणून टाकतात.

मा.आयुक्त :विकासाची जी कामे असतील, ती हाती घेण्यात येतील.

श्री.मकरंद कुलकर्णी :संचिका मंजूर केल्या. टेंडर झाले. आम्हाला त्या संचिकेच्या मागे फिरावे लागले. आता सांगतात की, रु.१० लक्षचेच काम होईल हे योग्य नाही.

मा.आयुक्त :फक्त रु.१० लक्षचे काम होणार असे नाही. परिस्थितीचा आढावा घेत आहोत. मागच्या सर्वसाधारण सभेत मी स्वत: म्हटले की, काही विभागाचे काम होत नाहीत. ती झाली पाहिजेत. जसे उद्यान, स्पोर्ट, हेरीटेज, पाणीपुरवठा, कचरा यावर बजेटची मी मागणी केली होती. मा.महापौरानी र.रु.१.२५ कोटीची कामे मंजूर केली आहे. सदस्यांनी सुचविलेली कामे गरजेप्रमाणे असतात. ती कामे घेतली पाहिजे. काही कामे २-२, ३-३ वर्ष चालतात. ही सिस्टम पण बदलली पाहिजे. जो निधि असतो. ती कामे पटकन झाली पाहिजे. विकासाचे काम जेथे गरज आहे. ती होतील. शहरात सर्व समानता ठेवून कामे करण्यात येईल. सगळीकडे कामे हाती घेतली पाहिजे. उत्पन्न वाढविणे, अनावश्यक खर्च कमी करणे व विकासाची सर्व कामे हाती घेणे. अशा प्रकारची भुमिका प्रशासनाची आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :टेंडर झाले एजन्सी फिक्सींगला आल्या. त्या संचिका मंजूर कराव्यात, र.रु.१० लक्षचा नवीन कामाच्या संचिका असतील. स्पीलची कामे असतात ती करावीच लागतात. दोन दोन वर्षापासून त्या संचिकेचा आम्ही पाठपुरावा करतो. त्या मंजूर कराव्यात. त्यानंतर नवीन संचिकेबाबत जसे उत्पन्न येईल. तसे काम करावे.

श्री.दिलीप थोरात :इन्टरनल ड्रेनेजच्या संचिका थांबून आहेत. त्या मंजूर कराव्यात. भुमिगतच्या माध्यमातून काम होत नाही.

श्री.मकरंद कुलकर्णी :टेंडर झालेल्या. संचिका मंजूर कराव्यात.

मा.महापौर :जे निविदा अंतर्गत प्रक्रियेसाठी अंदाजपत्रक मंजूरसाठी असेल मंजूर झाले असेल, निविदा प्रक्रिया झाली असेल, एजन्सी फिक्सींगसाठी असेल, वर्कऑर्डरचे साठी असलेली कामे असतील, ते करण्याचे प्रशासनाने मान्य केलेले आहे. ड्रेनेजची आवश्यक ती सर्व कामे करण्यात यावीत.

श्री.राजगौरव वानखेडे :माझे वार्डात नाल्यामध्ये अतिक्रमण चालू आहे. ते आतापर्यत काढले नाही.

श्री.राजू शिंदे :सभा तहकूब करावी. हर्सुल येथे पाहणीसाठी जायचे आहे.

मा.महापौर :इस्कॉन खिचडीचा प्रस्ताव आहे. तो मंजूर करण्यात येतो. श्री.भगवान मोरे यांचे कुटूंबीयांना आर्थीक मदत व इतर मदतीचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे.

**<u>विषय क्रमांक ४८८:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४८९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्यानगर वार्डातील चैतन्य को-ऑप हॉ.सोसायटी येथील बॅटमिंटन हॉलला “स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर” असे नाव देण्याची येथील नागरिकांची मागणी आहे.

करीता, सदरील बॅटमिंटन हॉलला “स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर” असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव **अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यानगर वार्डातील चैतन्य को-ऑप हॉ.सोसायटी येथील बॅटमिंटन हॉलला “स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४९०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मोह.अकीलउद्दीन नसीरउद्दीन औरंगाबाद हे वार्ड क्र.१०८ सिल्कमिल्स कॉलनी येथील रहिवासी असून भिवंडी मनपा प्राथमिक शिक्षण विभागात उर्दु माध्यम शाळेमध्ये सह-शिक्षक पदावर कार्यरत आहे. त्यांचे आई-वडील वृध्दावस्थेत आहेत. तसेच त्यांच्या वडिलांची प्रकृती खराब असल्याने त्यांची काळजी घेणारे कोणीही नाही. त्यामुळे त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पदस्थापना मिळणे बाबत ना-हरकत प्रमाणपत्र हवे आहे. तसा अर्ज अर्जदार यांनी आपल्या कार्यालयास सादर केलेला आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-**श्री.खान अय्युब म.हुसेन खान

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिवंडी महानगरपालिका येथील प्राथमिक शिक्षण विभाग, उर्दु माध्यम शाळेमध्ये सह-शिक्षक पदावर कार्यरत असलेले श्री.मोह.अकीलउद्दीन नसीरउद्दीन, राहणार सिल्कमिल्स कॉलनी औरंगाबाद यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यासाठी भिवंडी महानगरपालिकेला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा औरंगाबाद झोन कार्यालय क्रमांक-०१ अंतर्गत सन २०१८-१९ करीता स्पील ओव्हर कामांच्या यादी मध्ये Zone-01-spill P.No-01 कामाचे नाव

१. वार्ड क्र.५२ अंतर्गत पिया मार्केट मध्ये डांबरीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष)
२. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अंतर्गत श्री.अब्दुल समी ते जीन्दानी पॅथॉलॉजी ते जुब्लीपार्क पर्यंत डांबरीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष)

**या कामाऐवजी**

१. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अंतर्गत पिया मार्केट मध्ये कॉक्रीटीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष).
२. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अतंर्गत श्री.अब्दुल समी ते जीन्दानी पॅथॉलॉजी ते जुब्लीपार्क पर्यंत कॉक्रिटीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष).

करीता, सदरील कामाचे लेखाशिर्ष बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.एडके विकास प्रकाश **अनुमोदक:-**श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा औरंगाबाद झोन कार्यालय क्रमांक-०१ अंतर्गत सन २०१८-१९ करीता स्पील ओव्हर कामांच्या यादी मध्ये Zone-01-spill P.No-01 कामाचे नाव

१. वार्ड क्र.५२ अंतर्गत पिया मार्केट मध्ये डांबरीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष)
२. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अंतर्गत श्री.अब्दुल समी ते जीन्दानी पॅथॉलॉजी ते जुब्लीपार्क पर्यंत डांबरीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष).

**या कामाऐवजी**

१. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अंतर्गत पिया मार्केट मध्ये कॉक्रीटीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष).
२. वार्ड क्र.५२, खडकेश्वर अतंर्गत श्री.अब्दुल समी ते जीन्दानी पॅथॉलॉजी ते जुब्लीपार्क पर्यंत कॉक्रिटीकरण करणे, (रु.१५.०० लक्ष).

लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मालकीच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात श्री.रमेश मोतीलाल रुणवाल, ज्येष्ठ समाजसेवक तथा पुराणवस्तुचे तज्ञ व यशस्वी उद्योजक, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडे असलेला ५११ दुर्मिळ प्राचीन नाण्यांचा अनमोल ठेवा हा मनपाच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयाला विदेशी पर्यटक, ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या विद्यार्थी तथा रसिक नागरिकांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी मनपाच्या संग्रहालयास देण्याची इच्छा आहे. यामूळे संशोधन केंद्राच्या महसुलात वाढ होईल. तसेच यापूर्वी सुध्दा श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांनी दिनांक ०५.११.२००१ मध्ये त्यांनी ५५१ अनमोल दुर्मिळ नाणी आपल्या संशोधन केंद्राला दिलेल्या आहेत. त्याबद्दल त्यांनी त्यावेळेस कोणत्याही प्रकारचे मानधन घेतलेले नाही.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाचे नावलौकिक वृध्दिंगत होण्यासाठी व ऐतिहासिक महत्व टिकून राहण्यासाठी त्यात पुन्हा पुराणवस्तुंची वाढ होणे व त्याचे जतन होणे आवश्यक आहे. या संदर्भात पुराणवस्तु संग्रहालयासाठी ५११ दुर्मिळ प्राचीन नाणी कायम स्वरुपी देण्याची त्यांची इच्छा आहे. सदर दुर्मिळ प्राचीन नाण्यांचा या पुराणवस्तु संग्रहालयात समावेश केल्यास

एक ऐतिहासिक महत्व वाढेल व जनतेला पुराण व दुर्मिळ नाणी पाहण्याची संधी उपलब्ध होईल आणि पर्यटकांच्या संख्येत देखील वाढ होईल. तसेच यापुर्वी दिनांक ०५.११.२००१ रोजी झालेल्या करारनाम्या प्रमाणे श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांनी ५५१ प्राचीन दुर्मिळ नाणी कुठल्याही प्रकारचे मानधन न घेता महानगरपालिकेस दिलेली आहेत. दिनांक ०५.११.२००१ रोजीच्या ठरावांशी यांचा काही संबंध नाही.

श्री. रमेश मोतीलाल रुणवाल यांचेकडील प्राचीन, दुर्मिळ व मौल्यवान (अमुल्य) नाणी या वस्तु संग्रहालयासाठी उपयुक्त ठरले. सदर नाण्याची किंमत ही अमुल्य आहे. त्यांनी घेतलेले अथक परिश्रम आहेत. तसेच पुराणवस्तु संग्रहालयासाठी ही नाणी कायम स्वरुपी देण्यासाठी त्यांनी दर्शविलेली तयारी याचा विचार करता, त्यांना रुपये १०,०००/- मानधन प्रतिमाह देण्यात येणे संयुक्तीक ठरेल. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा श्री.विक्रम रमेश रुणवाल यांना हे मानधन देण्यात यावे. तसेच वस्तु संग्रहालयातील नाण्यांच्या दालनाला योग्य प्रकारचे सुशोभीकरण करुन जतनासाठी शोकेस व त्यामध्ये लाईटिंग लावण्यात यावी. संग्रहालयातील दालन क्र.०६ ला सौजन्य म्हणून “मातोश्री मदनबाई मोतीलाल रुणवाल” यांचे नाव सदर दालनात देण्यात यावे.

सद्यस्थितीत त्यांच्याकडे दुर्मिळ अनमोल ५११ नाणी असून ती नाणी सुध्दा त्यांना श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयास द्यावयाची इच्छा आहे. ते वेळोवेळी संग्रहालयामधील पुराणवस्तुमध्ये कशा प्रकारे वाढ होईल, पुराण वस्तु संग्रहालयाच्या वैभवात भर पडेल असे काम करतील. ज्या समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत त्या समित्यांच्या पदाधिकाऱ्यांना जे अधिकार प्राप्त आहे ते अधिकार रुणवाल यांना ही प्रदान करण्यात यावेत.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे, श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर
**अनुमोदक:-**श्री.शिल्पाराणी सागर वाडकर,श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी,श्री.आत्माराम माणिकराव पवार, श्री.गजानन भानूदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांचेकडील प्राचीन, दुर्मिळ व मौल्यवान (अमुल्य) नाणी कायम स्वरुपी देण्याची तयारी त्यांनी दर्शविलेली असून त्यांना रुपये १०,०००/- मानधन प्रतिमाह देण्यास व त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा श्री.विक्रम रमेश रुणवाल यांना हे मानधन देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच वस्तु संग्रहालयातील नाण्यांच्या दालनाला योग्य प्रकारचे सुशोभीकरण करुन जतनासाठी शोकेस व त्यामध्ये लाईटिंग लावणे, संग्रहालयातील दालन क्र.०६ ला “मातोश्री मदनबाई मोतीलाल रुणवाल” असे नाव देणे व ज्या समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत त्या समित्यांच्या पदाधिकाऱ्यांना जे अधिकार प्राप्त आहे ते अधिकार रुणवाल यांना देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४९३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भीमनगर अंतर्गत असलेले मौजे भावसिंगपुरा गट नं.४८ मधील विविध आरक्षित जागेवर भुसंपादनाची कार्यवाही करून विकसित करण्यात यावी. वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भीमनगर दक्षिण व वॉर्ड क्र.१३ भीमनगर उत्तर या दोन वॉर्डाची लोकसंख्या अंदाजे ४० ते ५० हजार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असल्याने या ठिकाणी प्रायमरी स्कुल, हायस्कुल व प्ले ग्राऊंड उपलब्ध नाहीत. वॉर्डातील गरीब कुटूंबातील

विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व होतकरु खेळाडूसाठी स्कुल व प्ले-ग्राऊंड उभारणे गरजेचे आहे. तरी महापालिका प्रशासनाने या विषयी दखल घेऊन नागरीहिताच्या दृष्टिने प्रस्ताव मंजुर करून मौजे भावसिंगपुरा, गट नं.४८ मधील अनुक्रमे भुखंड आरक्षण क्र.१३९-प्रायमरी स्कुल, १३५-हायस्कुल व १३८-प्ले-ग्राऊंड आदी गोष्टींची उभारणी करण्यात यावी. यासाठी प्रशासनाने ह्या आरक्षित जागेची भुसंपादनाची कार्यवाही लवकरात लवकर करावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भीमनगर अंतर्गत असलेले मौजे भावसिंगपुरा गट नं.४८ मधील आरक्षित भुखंड क्र.१३९-प्रायमरी स्कुल, १३५-हायस्कुल व १३८-प्ले-ग्राऊंड उभारणी करण्यासाठी ह्या जागेच्या भुसंपादनाची नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत गणेश कॉलनी/आलमगीर कॉलनी या ठिकाणी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत NUHM योजनेतून दवाखाना उभारण्यात येत आहे. या दवाखान्याला “ख्वाजा करिमोद्दीन सिद्दीकी” असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन **अनुमोदक:-**श्रीमती शेख नरगीस सलिम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत गणेश कॉलनी/आलमगीर कॉलनी येथे महानगरपालिकेमार्फत NUHM योजनेतून उभारण्यात येणाऱ्या दवाखान्यास “ख्वाजा करिमोद्दीन सिद्दीकी” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४, शहाबाजार मध्ये येणारे नाले या नाल्यांमध्ये लोकांनी केलेले अतिक्रमण व कचऱ्यामुळे हे नाले बंद झालेले आहेत. भुमिगत गटारी योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईनचे काम करण्याकरीता नाल्यांमध्ये खोदकाम करून पाईपलाईन टाकण्यात आल्या. सदर काम संपल्यावर कंत्राटदारांनी नाल्यांमधली माती भरती काढली नाही. कचऱ्यामुळे नाले बंद झालेले आहेत. पावसाळ्यापुर्वी नाले-सफाईची दक्षता घेणे आवश्यक होते. अद्यापपर्यंत शहाबाजार, अशोकनगर ते चाऊस कॉलनी व धोबीघाट पर्यंत नाले बंद असल्यामुळे साचलेल्या पावसाच्या पाण्यातून बऱ्याच लोकांची मालमत्ता, मिळकत आणि जीव धोक्यात आलेले आहेत. तरी तातडीने दिलेल्या ठिकाणच्या नाल्यांची सफाई करून कचरा काढण्यात यावा व या कामात दिरंगाई केल्यावर पावसाच्या पाण्यामुळे लोकांच्या जीवाला व मालमत्तेचे नुकसान झाले तर याची पुर्ण जबाबदारी महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर राहील आणि मनपाची दिरंगाई व निष्काळजीपणामुळे लोकांचे नुकसान झाले तर मनपा कडून नुकसान भरपाई देण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२४, शहाबाजार,अशोकनगर ते चाऊस कॉलनी व धोबीघाट पर्यंत नाले बंद असल्यामुळे साचलेल्या पावसाच्या पाण्यातून बऱ्याच लोकांची मालमत्ता, मिळकतीस बाधा निर्माण होत असल्याने तसेच नागरिकांच्या जिवीतांस धोका असल्याने तेथील नाल्यांची सफाई करून कचरा काढण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्षक बदलून रक्कम वळती करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | ०९ | प्रभाग क्र.९५ मध्ये आदर्श कॉलनी व भुषणनगर येथे काँक्रीटची कामे करणे. | २० लक्ष |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | ०९ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. | २० लक्ष. |

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | १० | प्रभाग क्र.९५ आदर्श कॉलनी, जयदुर्गा हौ.सो.येथील खुली जागा विकसीत करणे. | २० लक्ष |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | १० | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. | २० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती ज्योती राजाराम मोरे **अनुमोदक:-**श्री.पवार आत्माराम माणिकराव
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून रक्कम वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | ०९ | प्रभाग क्र.९५ मध्ये आदर्श कॉलनी व भुषणनगर येथे काँक्रीटची कामे करणे. | २० लक्ष |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | ०९ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. | २० लक्ष. |

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | १० | प्रभाग क्र.९५ आदर्श कॉलनी, जयदुर्गा हौ.सो.येथील खुली जागा विकसीत करणे. | २० लक्ष |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| ३० | १० | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. | २० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९ भडकलगेट, बुढ्ढीलेन येथील नागरिकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता, खालील कामांचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामांचे नाव | अं.प.र. रु. |
|---|---|---|---|
| SCR-Zone NO.01- P.No.3 Sr.no.27 | प्रभाग क्र.४९ मध्ये विविध भागात कॉंक्रीटी करणाची कामे करणे. तरतुद र.रु.२५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.४९ अंतर्गत जामा मस्जिद डीपी पासून ते नेहरुभवन बुढ्ढीलेन मेनरोड पर्यंत तसेच टाऊनहॉल ते काझीवाडा व श्री.मोबीन सिद्दीकी यांचे घरापासून दर्गा पर्यंत रस्त्यांचे दोन्ही बाजुस पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.४९ बुढ्ढीलेन, लोधीवाडा येथे महादेव मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे. | ०५.०० लक्ष |
| | | ३. वॉर्ड क्र.४९, जुनाबाजार, माळीवाडा भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. | ०५.०० लक्ष |
| | | ४. वॉर्ड क्र.४९, पानचक्की रोड, जमीलबेग मस्जिद जवळ व गल्लीमध्ये कॉंक्रीट करणे. | ०५.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ भडकलगेट, बुढ्ढीलेन येथील नागरिकांच्या सोईसाठी खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामांचे नाव | अं.प.र. रु. |
|---|---|---|---|
| SCR-Zone NO.01- P.No.3 Sr.no.27 | प्रभाग क्र.४९ मध्ये विविध भागात कॉंक्रीटी करणाची कामे करणे. तरतुद र.रु.२५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.४९ अंतर्गत जामा मस्जिद डीपी पासून ते नेहरुभवन बुढ्ढीलेन मेनरोड पर्यंत तसेच टाऊनहॉल ते काझीवाडा व श्री.मोबीन सिद्दीकी यांचे घरापासून दर्गा पर्यंत रस्त्यांचे दोन्ही बाजुस पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.४९ बुढ्ढीलेन, लोधीवाडा येथे महादेव मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे. | ०५.०० लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. वॉर्ड क्र.४९, जुनाबाजार, माळीवाडा भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. | ०५.०० लक्ष |
| | | ४. वॉर्ड क्र.४९, पानचक्की रोड, जमीलबेग मस्जिद जवळ व गल्लीमध्ये कॉंक्रीट करणे. | ०५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ४९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील नागरीकांच्या मागणीनुसार खालीलप्रमाणे जुने लेखाशिर्ष बदलुन देण्यात यावे.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील पवननगर येथे श्री.शरद चव्हाण यांचे घर ते कला हौ.सोसायटी पर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. (झोन क्र.०१ स्कील पेज नं.२४) रु.११.०० लक्ष | पहाडसिंगपुरा-बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.रु.११.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील बीबी का मकबरा ते लेणी परिसर रस्त्याचे डांबरीकरण करणे. (झोन नं.०१ स्कील पेज नं.०२) रु.३०.०० लक्ष | पहाडसिंगपुरा-बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. रु.३०.०० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा येथे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील पवननगर येथे श्री.शरद चव्हाण यांचे घर ते कला हौ.सोसायटी पर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. (झोन क्र.०१ स्कील पेज नं.२४) रु.११.०० लक्ष | पहाडसिंगपुरा-बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.रु.११.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील बीबी का मकबरा ते लेणी परिसर रस्त्याचे डांबरीकरण करणे. (झोन नं.०१ स्कील पेज नं.०२) रु.३०.०० लक्ष | पहाडसिंगपुरा-बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. रु.३०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८ मध्ये होणारी राज्यस्तरीय स्पर्धा १६ गर्ल्स् आणि बॉईज ज्युनीयर स्टेट लेव्हल वुशु चॅम्पीयनशीप या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून ३५ जिल्ह्यातील खेळाडू या स्पर्धेमध्ये भाग घेणार आहेत. या स्पर्धेसाठी खर्चाची एकूण र.रु.२० लक्ष ७० हजार एवढा खर्च येत

असून या स्पर्धेसाठी मनपा प्रशासनाकडून र.रु.५ लक्षची आर्थिक मदत मिळाल्यास ही स्पर्धा अतिशय उत्तम प्रकारे आयोजित करता येईल. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्यस्तरीय स्पर्धा १६ गर्ल्स् आणि बॉईज ज्युनीयर स्टेट लेव्हल वुशु चॅम्पीयनशीप या स्पर्धेसाठी मनपातर्फे र.रु.५ लक्षची आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ येथील कै.धन्नुलाल मेघावाले बहुऊद्देशीय हॉल व त्या समोरील खुली जागा राधाकिसन शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२२६, दि.१८.०९.२०१७ मंजुर झालेला आहे. सदरचे सभागृहाचे बांधकाम दि.२४.०२.२०१० रोजी झालेले असून तेव्हापासून आजपर्यंत सदरच्या हॉलपासून महानगरपालिकेस कोणतेही उत्पन्न मिळालेले नाही. शिवाय सदरच्या हॉलवर महानगरपालिकेस आतापर्यंत बराचसा खर्च करावा लागलेला आहे. त्यामुळे सदरच्या हॉलपासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळावे या दृष्टिकोनातून कै.धन्नुलाल मेघावाले बहुऊद्देशीय हॉल व त्या समोरील खुली जागा प्रतीमाह रु.६०००/- या प्रमाणे व महानगरपालिकेच्या इतर कर आकारणी अटीस अधिन राहून भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सिमा गणपत खरात **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.उपमहापौर :यापुर्वी दिनांक २०.०७.२०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ११३६ नुसार मंजुर असून त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येऊन सदरील सभागृह व त्या समोरील खुली जागा राधाकिसन शिक्षण प्रसारक मंडळ यांना रु.६०००/- मासिक भाडेतत्वावर देण्यात यावे. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्रीमती सिमा खरात :सदरील सभागृह व त्या समोरील खुली जागा १० वर्ष कालावधी करीता राधाकिसन शिक्षण प्रसारक मंडळास देण्यात यावी.

मा.महापौर :स.उपमहापौर तसेच स.पालिका सदस्या श्रीमती सिमा खरात यांनी सुचविलेल्या दुरुस्तीनुसार व केलेल्या मागणीनुसार विषय क्रमांक-११३६ च्या ठरावामध्ये दुरुस्ती करून सदरील दुरुस्तीचा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२८ मधील कै.धन्नुलाल मेघावाले बहुऊद्देशीय हॉल व त्या समोरील खुली जागा प्रतीमाह भाडे रु.६०००/- या प्रमाणे राधाकिसन शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस महानगरपालिकेच्या इतर कर आकारणी अटीस अधिन राहून १० वर्ष कालावधी करीता भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९, श्रीकृष्णनगर मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **पान क्र. व अ.क्र.** | **जुने लेखाशिर्ष** | **नविन लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| SCR-Zone-4, P.No.13 | प्रभाग क्र.२९ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. आर्थिक तरतुद १५ लक्ष. | प्रभाग क्र.२९ अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणी जलनि:सारण वाहिनी दुरुस्ती करणे, बदलणे, चेंबर बांधणे व ढापे टाकणे. या कामासाठी र.रु.१५.०० लक्षची निधी वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्रीमती शोभा नारायण वळसे

**अनुमोदक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे,

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२९, श्रीकृष्णनगर येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| **पान क्र. व अ.क्र.** | **जुने लेखाशिर्ष** | **नविन लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| SCR-Zone-4, P.No.13 | प्रभाग क्र.२९ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. आर्थिक तरतुद १५ लक्ष. | प्रभाग क्र.२९ अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणी जलनि:सारण वाहिनी दुरुस्ती करणे, बदलणे, चेंबर बांधणे व ढापे टाकणे. या कामासाठी र.रु.१५.०० लक्षची निधी वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका आस्थापनेवरील कायम स्वरुपी वर्ग-४ कर्मचारी (महिला व पुरुष कर्मचारी) यांना प्रत्येक वर्षी फिकट निळ्या रंगाचे ॲप्रॉन व दर दोन वर्षांनी स्त्री व पुरुष कर्मचारी यांना निळ्या रंगाचे स्वेटर व ब्लँकेट हिवाळा लागण्यापूर्वी देण्यात यावे. जेणे करून त्यांना हिवाळ्यात ऊबदार पांघरूण असेल तर साफ-सफाईची कामेही चांगल्या प्रकारे होतील. सद्यस्थितीत कचऱ्याची समस्या बिकट असल्याने कर्मचाऱ्यांनाही सुविधा देणे अत्यावश्यक आहे. याची सुरुवात यावर्षी पासून होणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, **अनुमोदक:-**श्री.जायभाय रमेश भानुदास

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. सदरील कार्यवाही या वर्षापासून सुरु करण्यात यावी

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनेवरील कामयस्वरुपी वर्ग-४ कर्मचारी (महिला व पुरुष कर्मचारी) यांना प्रत्येक वर्षी फिकट निळ्या रंगाचे ॲप्रॉन व दर दोन वर्षांनी स्त्री व पुरुष कर्मचारी यांना निळ्या रंगाचे स्वेटर व ब्लँकेट हिवाळा लागण्यापूर्वी या वर्षापासुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० अंतर्गत नागरीकांचे सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. करीता, खालील कामांचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| Adm.new. Work P.No.1 Sr.No.05 | वॉर्ड क्र.५० अंतर्गत बारापुल्ला गेट ते मिलकॉर्नर चौकापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १. वॉर्ड क्र.५० लक्ष्मी कॉलनी बुध्दविहारा जवळ विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | २०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.५० लक्ष्मी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | १५.०० लक्ष |
| | | ३. वॉर्ड क्र.५०. अंतर्गत गरमपाणी येथील जलतरण तलाव जवळील विविध गल्ल्यांत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | ५०.०० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० अंतर्गत खालील कामांचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| Adm.new. Work P.No.1 Sr.No.05 | वॉर्ड क्र.५० अंतर्गत बारापुल्ला गेट ते मिलकॉर्नर चौकापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १. वॉर्ड क्र.५० लक्ष्मी कॉलनी बुध्दविहारा जवळ विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | २०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.५० लक्ष्मी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | १५.०० लक्ष |
| | | ३. वॉर्ड क्र.५०. अंतर्गत गरमपाणी येथील जलतरण तलाव जवळील विविध गल्ल्यांत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | ५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु.ज्योती रामकिशन चौडे या विद्यार्थीनीने सॉफ्ट बॉल स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावलेला असून औरंगाबाद या शहराचे नाव लौकीक केले. तीचे मनपातर्फे अभिनंदन करण्यात यावे. तसेच या होतकरु मुलीची आर्थीक परिस्थिती हलाखीची असून तीच्या पुढील वाटचालीसाठी मनपा प्रशासनाकडे र.रु.५ लक्षची आर्थीक मदत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सॉफ्ट बॉल स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावलेल्या कु.ज्योती रामकिशन चौडे या विद्यार्थीनीस तीच्या पुढील वाटचालीसाठी मनपातर्फे र.रु.५ लक्षची आर्थीक मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास तसेच या विद्यार्थीनीचे मनपातर्फे अभिनंदन करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ५०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद येथील कु.हर्षदा चंद्रकांत घुसारी हिला पुणे येथील अखिल भारतीय सांस्कृतिक संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या भरतनाट्यम स्पर्धेत देशभरातील १००० स्पर्धकामधून चेअरमन ॲवार्ड मिळालेला आहे.

करीता, तीला या यशाबद्दल मनपा प्रशासनाच्या वतीने मा.सर्वसाधारण सभेत अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करावा व तीची दुबई येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भरतनाट्यम स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांना महानगरपालिकेच्या वतीने र.रु.२ लक्षची मदत करावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

**अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार, श्रीमती सीमा गणपत खरात.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कु.हर्षदा चंद्रकांत घुसारी हिची दुबई येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भरतनाट्यम स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल मनपातर्फे अभिनंदन करण्यास व महानगरपालिकेच्या वतीने र.रु.२ लक्षची मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ट कामाचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | लेखाशिर्ष बदलून नवीन काम करणे |
|---|---|---|
| १. | एन-५, भोला पान सेंटर ते अविष्कार चौक पर्यंत रस्त्याचे ट्रिमीक्स कॉंक्रीटीकरण सहीत पाथ-वे तयार करणे.<br>Sr.No.३७ SCR-zone-५ P.No.२०<br>र.रु.१.७० कोटी | १.वॉर्ड क्रमांक ६४ गुलमोहर कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी विकासात्मक कामे करणे. र.रु.१.७० कोटी. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:-**श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | लेखाशिर्ष बदलून नवीन काम करणे |
|---|---|---|
| २. | एन-५, भोला पान सेंटर ते अविष्कार चौक पर्यंत रस्त्याचे ट्रिमीक्स कॉंक्रीटीकरण सहीत पाथ-वे तयार करणे.<br>Sr.No.३७ SCR-zone-५ P.No.२०<br>र.रु.१.७० कोटी | १.वॉर्ड क्रमांक ६४ गुलमोहर कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी विकासात्मक कामे करणे. र.रु.१.७० कोटी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शालेय विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासनामार्फत अंमलात असलेली शालेय पोषण आहार योजना अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रभावीपणे राबविण्याकरीता **अन्नामृत फाऊंडेशन, औरंगाबाद** यांचा प्रस्ताव सादर झालेला आहे. सदर संस्था जानेवारी २०१२ पासून औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व शाळांना मध्यान्ह भोजन पुरवठा करीत आहे. ISO-22000-2005 प्रमाणपत्र असलेली सदरील संस्था आधुनिक स्वयंचलित यंत्राद्वारे धान्य स्वच्छ करण्यापासून ते भोजन सिलबंद डब्यांमध्ये भरणे पर्यंत निर्जंतुकीकरणाची संपुर्ण काळजी घेऊन अन्नाचा दर्जा व चव इ.विषयी खबरदारी घेऊन संस्था महानगरपालिकेच्या १२ हजार विद्यार्थ्यांसह महानगरपालिका हद्दीतील खाजगी संस्थेच्या शाळांच्या किमान ३५००० शालेय विद्यार्थ्यांना दररोज अखंडीतपणे मध्यान्ह भोजन पुरवठा करीत आहे.

दिनांक २०.०१.२०१५ विषय क्रमांक-६८९ नुसार मा.सर्वसाधारण सभेने **मे.इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन** (नाव बदललेले : अन्नामृत फाऊंडेशन) या संस्थेस महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार संस्था मध्यान्ह भोजन महानगरपालिकेच्या शाळांना पुरवठा करीत आहे. संस्थेसोबत करण्यात आलेल्या करारनाम्याची दिनांक ३०.०४.२०१८ रोजी संपली आहे. पुढील तीन (३) शैक्षणिक वर्षाच्या कालावधीसाठी अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेस शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याची जबाबदारी सोपविणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २०.०१.२०१५ विषय क्रमांक-६८९ नुसार मा.सर्वसाधारण सभेने **मे.इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन** (नाव बदललेले:अन्नामृत फाऊंडेशन) या संस्थेस महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार संस्था मध्यान्ह भोजन महानगरपालिकेच्या शाळांना पुरवठा करीत आहे. संस्थेसोबत करण्यात आलेल्या करारनाम्याची दिनांक ३०.०४.२०१८ रोजी संपली असून पुढील तीन (३) शैक्षणिक वर्षाच्या कालावधीसाठी अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेस शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याची जबाबदारी सोपविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे. करीता, खालील प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत शैलेश हॉटेल ते मा.उच्च न्यायालय भींतीपर्यंत डांबरीकरण करणे. Spill-P.No.133 Sr.No.09 (र.रु.१४.६० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गिरीजादेवी हौसिंग सोसायटी येथील गटार बांधून लोखंडी जाळ्या टाकणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथील रस्ता डांबरीकरण करणे. Spill-P.No.133 Sr.No.11 (र.रु.११.७१ लक्ष) | २. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गल्ली क्र.०७ येथे खडी मुरूम टाकणे, खड्डे बुजविणे. (र.रु.०१ लक्ष) |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्रीमती सिमा गणपत खरात

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत शैलेश हॉटेल ते मा.उच्च न्यायालय भींतीपर्यंत डांबरीकरण करणे. Spill-P.No.133 Sr.No.09 (र.रु.१४.६० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गिरीजादेवी हौसिंग सोसायटी येथील गटार बांधून लोखंडी जाळ्या टाकणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथील रस्ता डांबरीकरण करणे. Spill-P.No.133 Sr.No.11 (र.रु.११.७१ लक्ष) | २. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गल्ली क्र.०७ येथे खडी मुरूम टाकणे, खड्डे बुजविणे. (र.रु.०१ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये रात्री पावसाने धुमाकूळ घातलेला असून श्री.भगवान निवृत्ती मोरे यांचा जयभवानीनगर येथील नाल्यात पडून मृत्यु झालेला आहे. त्यांच्या घरातील ते कर्ता पुरूष होते. त्यांच्या कुटूंबीयांना र.रु.०५.०० लक्षची आर्थीक मदत करण्यात यावी व हर्सुल येथील मनपाच्या मालकीच्या जागेवर त्यांना मनपातर्फे घरकूल देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.विकास रतनलाल जैन

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे

मा.महापौर :प्रस्ताव सर्वानुमते मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक १९.०६.२०१८ रोजी रात्री झालेल्या पावसामुळे जयभवानीनगर येथील नाल्याच्या पुरात श्री.भगवान निवृत्ती मोरे यांचा दुर्दैवी मृत्यु झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून कुटूंबातील एकमेव कमावत्या व्यक्तीचा अपघाती मृत्यु झाल्याने त्यांच्या पत्नी श्रीमती अरुणाबाई भगवान मोरे यांना र.रु.५.०० लक्षची आर्थिक मदत देण्यास व हर्सुल येथील महापालिकेच्या मालकीच्या जागेवर २०X३० फुट निवासी प्लॉट देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

श्रीमती अरुणाबाई भगवान मोरे (पत्नी) यांना र.रु.३.०० लक्ष Fix Deposit (मुदत ठेव) व र.रु.२.०० लक्ष धनादेशद्वारे देण्यात यावेत. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद